# जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २२ ऑगस्ट : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे दोन दिवसीय शारीरिक शिक्षण संचालक क्रीडा शिबिराचा समारोप विद्यापीठाच्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम भवनातील सभागृहात कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २२ ऑगस्ट रोजी संपन्न झाला. यावेळी गणितशास्त्र प्रशाळेचे संचालकप्रा. के.एफ. पवार व क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटील उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी म्हणाले की, क्रीडा व गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. या शिबीरातून मिळालेले मार्गदर्शन इतरांपर्यंत पोहचवून विद्यापीठातील खेळाडूंची कामगिरी देशपातळीपर्यंत पोहचवून विद्यापीठाचा नावलौकीक वाढवावा असे आवाहन केले. डॉ.दिनेश पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. क्रांती क्षीरसागर व डॉ. संजय भावसार यांनी शिबीराबद्दल मनोगत व्यक्त केले.

सकाळ सत्रात विद्यापीठातील योग विभागाच्या डॉ. गितांजली भंगाळे यांनी प्रात्यक्षिक तर डॉ. लिना चौधरी यांनी मार्गदर्शन केले. नंतरच्या सत्रात प्रशांत जगताप यांनी फेनसींग / सॉफ्टबॉल यावर तर डॉ. जगदीश तोरवणे यांनी राष्ट्रध्वज संहिता यावर मार्गदर्शन केले. या दोन दिवसीय शिबिरास जळगाव, धुळे, नंदुरबार तसेच एरंडोल विभागातील कार्यरत ८० शारीरिक शिक्षण संचालक उपस्थित होते. आभार डॉ. हर्षदा पाटील यांनी मानले.

**बातमी क्र. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २२ ऑगस्ट : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत कार्यरत असलेल्या केबीसीएनएमयू सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन अँड लिंकेजेस (केसीआयआयएल) यांच्यातर्फे जागतिक उद्योजक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास उद्योजक छबीराज राणे, प्रा. अरुण इंगळे, डॉ. राजेश जवळेकर, उद्योजक निखिल पाटील, डॉ. नवीन खंडारे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना उद्योजक छबीराज राणे यांनी उद्योजकतेचे महत्त्व, नवसंकल्पनांचे मूल्य आणि युवा पिढीने उद्योजकतेकडे वळण्याची गरज यावर सविस्तर विचार मांडले. "संधी आयुष्यात एकदाच दार ठोठावते, ती वेळीच ओळखून झोकून द्या," असा महत्त्वाचा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. संधीचे सोने करण्यासाठी योग्य वेळी धाडसी निर्णय घेण्याची तयारी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना उद्योजक निखिल पाटील यांनी आपल्या उद्योजकीय प्रवासाचा अनुभव उपस्थितांसोबत सामायिक केला. गो अआधारित उत्पादनांच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या आपल्या स्टार्टअपची वाटचाल, त्यातील आव्हाने आणि संधी याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रत्यक्षात आणताना येणाऱ्या अडचणींवर मात कशी करावी, याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मौलिक टिप्स दिल्या.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. अरुण इंगळे यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण जोखीम घेऊन स्टार्टअप व उद्योजकतेच्या संधी शोधाव्यात, असे कौतुकास्पद आवाहन केले. योग्य नियोजन व अभ्यासपूर्ण निर्णयक्षमतेच्या आधारे घेतलेली जोखीम ही यशस्वी उद्योजकतेची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच विद्यापीठ स्तरावर उद्योजकता संस्कृती रुजवण्याच्या दृष्टीने केसीआयआयएलच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमादरम्यान गतवर्षीच्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉन (SIH) राष्ट्रीय विजेत्या विद्यार्थ्यांसोबत उपस्थित विद्यार्थ्यांचा विशेष संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांमधून १३० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते इंटर्नल स्मार्ट इंडिया हॅकेथॉन पोस्टरचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेश जवळेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. अनिकेत पठाडे यांनी केले.

**बातमी क्रमांक ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २२ ऑगस्ट : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भौतिकशास्त्र प्रशाळेतील इलेक्ट्रॉनिक्स विभागात बी.एस्सी. (ऑनर्स) इलेक्ट्रॉनिक्स आणि एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) या दोन्ही अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या दोन्ही अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ असून पात्र विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत नोंदणी करून प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन भौतिकशास्त्र प्रशाळेच्या संचालकांनी केले आहे.

बी.एस्सी. (ऑनर्स) इलेक्ट्रॉनिक्स या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी १२ वी विज्ञान विषयात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. याशिवाय इलेक्ट्रॉनिक्स किंवा इलेक्ट्रिकल विषयातील डिप्लोमा पूर्ण केलेले विद्यार्थी तसेच इलेक्ट्रॉनिक्स किंवा इलेक्ट्रिकल विषयासह १२ वी (एम. सी. व्ही. सी.) कोर्स पूर्ण केलेले विद्यार्थीही या अभ्यासक्रमासाठी पात्र आहेत. तसेच एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) या पदव्युत्तर

अभ्यासक्रमासाठी बी एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स /फिजिक्स/ कम्प्युटर सायन्स/ इलेक्ट्रॉनिक सायन्स) यापैकी कोणत्याही विषयातील पदवीधारक विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र आहेत. तसेच बी वोक. (इन इंडस्ट्रियल ऑटोमेशन) ही पदवी असलेले विद्यार्थीही प्रवेश घेऊ शकतात. याशिवाय इलेक्ट्रॉनिक अँड टेलिकम्युनिकेशन इलेक्ट्रॉनिक किंवा इन्स्ट्रुमेंटेशन या विषयांसह B.E./B.Tech. पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांनाही एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) अभ्यासक्रमासाठी प्रवेशाची संधी उपलब्ध आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया, पात्रता व इतर आवश्यक माहितीसाठी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. दोन्ही अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ असल्याने पात्र विद्यार्थ्यांनी विलंब न करता प्रवेश प्रक्रियेत सहभागी होऊन आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

........................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २२ ऑगस्ट, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,जळगाव

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता